महाराष्ट्र शासन

अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई

लेखा कोष भवन, ए विंग, वांद्रे - कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
टेलीफोन क्र. २६५६६३२९/३३०

: ई-लिलाव नोटीस:

अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई कार्यालयातील जुनी रद्दी अधिदान व लेखा कार्यालय, जुने अभिलेख कक्ष एपिजे हाऊस, ७ वा मजला दिनशॉ वाच्छा रोड केसी कॉलेजच्या बाजूला, चर्चगेट मुंबई व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ४ था मजला सिडको भवन दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई येथून उचलण्यासाठी ई-लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे.

सदर ई-लिलावाबाबत सविस्तर अटी व शर्ती व संपूर्ण माहिती शासनाच्या **eauction.gov.in** या संकेतस्थळावर दि. ०४/०९/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ई-लिलाव प्रक्रियेचा दिनांक		
	दिनांक	**वेळ**
१.निविदा प्रसिध्दीचा दिनांक	०४/०९/२०२४	सकाळी १०:०० पासून
२. निविदा फॉर्म कागदपत्रे सादर करणे/धनाकर्ष स्विकारण्याचा दिनांक	०४/०९/२०२४	सकाळी १०:०० पासून
३. निविदा फॉर्म कागदपत्रे सादर करणे/धनाकर्ष स्विकारण्याचा शेवटचा दिनांक	१८/०९/२०२४	सायंकाळी ०५:३० पर्यंत
४.प्राप्त निविदा फॉर्म कागदपत्रे /धनाकर्ष रक्कम मंजूरी देण्याची प्रक्रीया सूरू करण्याचा दिनांक	१९/०९/२०२४	सकाळी १०:३० पासून
५. .प्राप्त निविदा फॉर्म कागदपत्रे /धनाकर्ष रक्कम मंजूरी देण्याचा शेवटचा दिनांक	२४/०९/२०२४	सायंकाळी ०५:३० पर्यंत
६. लिलाव सुरु व बंद करण्याचा दिनांक	२५/०९/२०२४	सकाळी १०:०० पासून दुपारी ०१:३० पर्यंत

कोणतीही ई-लिलाव बोली अथवा सर्व ई-लिलाव बोली कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच ई-लिलाव याची कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अधिकार मा. अधिदान व लेखा अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे. ज्या संस्थाना ई-लिलावाबाबत या कार्यालयाच्या सर्व अटी व शर्ती मान्य असतील अशाच संस्थांनी ई-लिलावामध्ये भाग घ्यावयाचा आहे.

(विलास गांगुर्डे)
अधिदान व लेखा अधिकारी

ई-लिलाव अटी व शर्ती

१. रद्दी उचलण्याची लिलाव प्रक्रिया (ई-लिलाव) संगणकावर ऑनलाईन पध्दतीने करणेत येईल या ई-लिलावा संबंधित सर्व माहिती सूचना व शुध्दीपत्रके इत्यादी ई- लिलाव प्रणालीद्वारे ऑनलाईन (**eauction.gov.in**) वर प्रसिध्द करणेत येतील.

२. सदर रद्दी अधिदान व लेखा कार्यालय, द्वारा जुने अभिलेख कक्ष, एपिजे हाऊस, ७ वा मजला दिनशॉ वाच्छा रोड केसी कॉलेजच्या बाजूला, चर्चगेट मुंबई व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ४ था मजला सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे ठेवण्यात आलेली आहे. दि.०४/०९/२०२४ ते दि.१८/०९/२०२४ पर्यंत दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत त्याची प्रत्यक्ष पाहणी करून प्रति कि.ग्रॅ.चे जास्तीत जास्त दर नमूद करावेत, नंतर कोणतीही तक्रार आणि सबब स्वीकारली जाणार नाही.

३. ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेणारी संस्था मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) परिक्षेत्रातील असणे आवश्यक आहे. MMRDA परिक्षेत्रा बाहेरील संस्थेने ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेतल्यास निविदा स्वीकृत केल्या जाणार नाहीत.

४. कार्यालयातील रद्दीची प्रारंभिक अंदाजित बोली प्रति कि.ग्रॅ. रक्कम रु. १६/- इतकी आहे सदर रकमेवर वाढीव बोली रक्कम रु. १/- प्रति कि.ग्रॅ. च्या पटीत असेल.(वाढीव बोली रकमेत फेरबदल करावयाचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहे.)

५. सदर निविदा कोरे नमुना शुल्क रु.१७००/- इतकी आहे. सदर रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) ASSISTANT PAY AND ACCOUNTS OFFICER या नावाने दि. ०४/०९/२०२४ ते दि. १८/०९/२०२४ पर्यंत वांद्रे येथील कार्यालयात जमा करावयाचा आहे. सदर शुल्क ना-परतावा असून निविदा फॉर्म **eauction.gov.in** या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल.

६. इसारा रक्कम (EMD) रु.८५००/- इतकी असून सदर रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) ASSISTANT PAY AND ACCOUNTS OFFICER या नावाने या कार्यालयात दि. ०४/०९/२०२४ ते दि. १८/०९/२०२४ पर्यंत जमा करण्यात यावा.

७. खालील कागदपत्रे **eauction.gov.in** या संकेतस्थळावर दि. ०४/०९/२०२४ ते दि. १८/०९/२०२४ पर्यंत online पध्दतीने upload करणे अनिवार्य आहे.

१.निविदा नमुना प्रपत्र 'अ '.
२. पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र.
३. ASSESSMENT YEAR २०२३-२४ किंवा २०२४-२५ साठी आयकर विवरणपत्र
४. वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र
५. दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र. (केवळ MMRDA परिक्षेत्रातील)
६. ई-लिलाव अटी व शर्तीच्या प्रतीवर साक्षांकित करण्यात यावे. (सही व शिक्यानिशी).

वरील १ ते ६ कागदपत्रांची मुद्रित स्वरूपातील (print) प्रत साक्षांकित करून दि. १८/०९/२०२४ पर्यंत वांद्रे येथील कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील. जर एखादी संस्था कागदपत्रे online upload करु शकला नाही किंवा **eauction** वर online लिलाव प्रक्रियेत येऊ शकला नाही तसेच MMRDA परिक्षेत्राच्या बाहेरील संस्थने **eauction** मध्ये भाग घेतल्यास त्यांची निविदा स्वीकृत केली जाणार नाही. व कोणत्याही परिस्थितीत निविदा शुल्क परत केले जाणार नाही व त्याचबरोबर कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही.

८. ज्या संस्थेस ई-लिलावाचा ठेका देण्यात येईल, त्या संस्थेने विक्री करण्यात येणारे रद्दी पेपरचा कुठल्याही प्रकारे गैरवापर करण्यात येणार नसल्याचे हमीपत्र दयावे व सुरक्षा ठेव म्हणून रु. ३०,०००/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) ASSISTANT PAY AND ACCOUNTS OFFICER या नावाने या कार्यालयात कार्यादेश दिल्यापासून २ दिवसांच्या आत हमीपत्र व धनाकर्ष जमा करणे अनिवार्य आहे. जर ठेकेदार सुरक्षा ठेव रक्कम कार्यालयाकडे वेळेत जमा करण्यास असमर्थ ठरल्यास त्याचा ठेका रद्द करून त्याची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

९. रद्दी प्रत्यक्ष ताब्यात घेणेपुर्वी कंत्राटदाराने रद्दी वाहतुक करण्यात येणारे Empty वाहनाचे वजन Weighing scale वर करणे आवश्यक आहे. तसेच रद्दीच्या सर्व गोणी वाहनामध्ये भरल्यानंतर त्याचे त्याच (Weighing scale) वजन काटयावर करणे आवश्यक आहे व दोन्ही वेळच्या वजनाच्या मुळ पावत्या कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक राहील. तसेच empty वाहनाचे वजन करतेवेळी आणि वाहनात रद्दी भरल्यानंतर वाहनाचे वजन करतेवेळी अशा दोन्ही वेळेस अधिदान व लेखा कार्यालयाचे दोन कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहतील व त्यांचे निरीक्षणाखाली दोन्ही वेळचे वजनाची पडताळणी करण्यात येईल. व त्यानुसार रददीचे पैसे कार्यालयाकडे आगावू जमा केल्यानंतरच रद्दी कंत्राटदारास सुपुर्त करणेत येईल.

१०. ज्या संस्थेची ई-लिलाव बोली प्रति कि. ग्रॅ. चे दर इतर संस्थांपेक्षा सर्वात जास्त असेल अशाच संस्थेस रद्दीची विक्री करण्यात येईल. नियुक्त संस्थेने वजन केलेली रद्दी उचलण्यापुर्वी रद्दीची संपूर्ण रक्कम धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) द्वारे या कार्यालयात जमा करणे अनिवार्य आहे.

११. जुने रद्दी जेथे आहे त्यास्थितीत अटी व शर्तीच्या अधीन राहून फाडल्यानंतरच उचलावी लागेल. सदर जुन्या रद्दीमध्ये नस्तीसाठी वापरण्यात येणारे पुठ्ठे व झाडलोटीच्या कचऱ्यातील कागदांचा समावेश असल्यामुळे सदर रद्दी आहे त्या अवस्थेत फाडून उचलावी लागेल.

१२. तसेच रद्दी उचलताना सुतळी, गोणी व तत्सम सर्व प्रकारचे साहीत्य, मजुरांची व्यवस्था तसेच रद्दीच्या वाहतूकीचा सर्व प्रकारचा व संपूर्ण खर्च ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल.

१३. ठेका मंजूर केलेल्या संस्थेने रद्दी उचलण्याचे काम कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत साप्ताहिक/ सार्वजनिक सुटया वगळून कामकाजाच्या दिवशी करावयाचे आहे.

१४. विक्री करण्यात आलेली रद्दी पेपरचा पेपर मिलमध्ये लगदा केल्याचे प्रमाणपत्र जमा करावे लागेल.

१५. रद्दी पेपर नेताना कार्यालयाच्या इमारतीचे/आवारातील कोणत्याही साहित्याचे कसलेली नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदारांकडुन त्याच ठिकाणी (On the Spot) रोखीच्या स्वरूपात वसूल करण्यात येईल व याबाबत ठेकेदारास बाजू मांडण्याची कोणतीही संधी दिली जाणार नाही.

१६. कोणतेही दर मंजूर वा रद्द करणे तसेच रद्दी विक्रीची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमिमांसा केली जाणार नाही.

***अधिदान व लेखा कार्यालयाची जुनी रद्दी उचलण्याबाबत ठेक्याच्या ई-लिलावात नमूद केलेल्या वरील सर्व अटी/शर्ती मला संपूर्णपणे तसेच बिनशर्तपणे मान्य आहेत. तसेच सदर अटी आणि शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार किंवा हरकत असणार नाही.**

नाव ---------- स्वाक्षरी व संस्थेचा रबरी शिक्का ----------